**महाराष्ट्र शासन**
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड
Dr.ShankarraoChavanGovt.Medical College, Vishnupuri, Nanded
Phone No. ०२४६२ २२९२७७ (A.O.) Dean ०२४६२ २२९२७४ Email:gmcnanded@gmail.com/gmcnanded@rediffmail.com

जा.क्र.डॉशंचशावैमनां/लले/ 613 /२०२३ दिनांक :-११.११.२०२३

# प्रेस नोट

शनिवार दि.११-११-२०२३ रोजी सकाळी ६.३० वाजता डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपूरी,नांदेड येथे परीसरामध्ये एक अनोळखी पुरुष व्यक्ती अंदाजे वय- ३५ आढळून आल्याने कर्तव्यावरील सुरक्षारक्षक तसेच वर्ग-४ कर्मचारी यांनी अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी यांना माहिती दिली. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी यांनी सदरील अनोळखी पुरुष व्यक्तीस कर्तव्यावरील सुरक्षारक्षक व वर्ग-४ कर्मचारी यांच्या मदतीने उपचाराकरीता अपघात विभागात हलविले व कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी तपासणी केली असता त्या व्यक्तीस मृत घोषीत केले. डॉक्टरांनी याबाबतची माहिती कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचारी यांना दिली. तद्‌नंतर सदर रुग्णांचे मृत्यूचे कारण समजण्याकरीता शवचिकित्सा करण्यात आली.

सदर व्यक्तीबाबत माहिती घेतली असता श्री.तुकाराम नागोराव कसबे, वय -३५ वर्ष यांना दि.३०-१०-२०२३ रोजी क्षयरोग आजाराच्या उपचाराकरीता श्वसनविकार विभागातंर्गत वॉर्ड क्र १४ मध्ये दाखल करण्यात आलेले होते. सदर रुग्णास Post Tuberculosis with cor - Pulmonale असे आजाराचे निदान झाले. त्या आजाराच्या अनुषंगाने योग्य ते उपचार करण्यात आले. त्यानंतर दि.०९-११-२०२३ रोजी सुस्थितीत सदर रुग्णास औषधीसहीत नातेवाईकांसमवेत रुग्णालयातून सुट्टी देवून घरी पाठविण्यात आले. सदर रुग्ण दि.०९-११-२०२३ रोजीनंतर रुग्णालयात उपचाराकरीता आलेला नव्हता. सदर रुग्ण परस्पर रुग्णालयाच्या परीसरामध्ये कर्तव्यावरील सुरक्षारक्षक व वर्ग-४ कर्मचारी यांना दि.११-११-२०२३ रोजी सकाळी ६.३० वाजता आढळून आला.

सदरील इसमाच्या शरीरावरील आढळून आलेल्या जखमा हया मृत्यूनंतर झाल्या असल्याचे आणि त्या जखमांचा मृत्यूशी संबंध नसल्याचे शवचिकित्सेमध्ये आढळून आले आहे. अंतिम मृत्यूचे कारण समजण्याकरीता सदर व्यक्तीचा व्हिसरा हा केमिकल ॲनिलेसिस व हिस्टो पॅथोलॉजी तपासणीसाठी राखून ठेवण्यात आला आहे.

रुग्णालय परीसरातील मोकाट डुकरांच्या बंदोबस्ताबाबत सक्षम अधिकारी महानगरपालिका,नांदेड, पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड व ग्रामपंचायत, विष्णुपूरी यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आले आहे.

वैद्यकीय अधिक्षक
डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नांदेड

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड यांना विनंती करण्यात येते की, सदर बातमीस वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.